# जाहीर सुचना/प्रसिध्दी पत्रक

क्र.२०१८/वि.स.स.अभि./पॅ.ने./जाहिरात/२०२२
जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर
प्रशासकीय इमारत,१०वा मजला,शासकीय
वसाहत,बांद्रा (पूर्व),मुंबई ४०००५१
दिनांक: १६ /०२ /२०२२

महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एसपीपी/१०९९/३०९६/प्र.क्र. १५२/पोल-१०, दिनांक ०९ मे २००० तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५ (३) नुसार मुंबई उपनगर जिल्हयातील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालयातील फौजदारी विभागाचे विशिष्ट खटल्यांचे कामासाठी २० (वीस) रिक्त पदांसाठी विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचे तात्पुरता पॅनल नेमणूकीसाठी खालील नमूद अटी व शर्तीवर इच्छुक उमेदवारांकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता या पदासाठी अर्जदार हा भारताचा नागरीक असावा.

२.अर्जदार मान्यताप्राप्त विधी शाखेचा पदवीधारक असावा. तसेच बार कौन्सिलचे रजिष्ट्रेशन कमीत कमी ५ वर्षे पुर्ण झालेले असावे.

३. सदर पदासाठी अर्जदाराचे वय ३८ वर्षापेक्षा अधिक असु नये. मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५ वर्षाने शिथिलक्षम.

४.सदर पदासाठी उच्च न्यायालय किंवा त्याहुन दुय्यम न्यायालयातील कामकाजाचा ५ वर्षापेक्षा जास्त वकीलीचा अनुभव असावा.

५. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदावर काम करतांना सदर अभियोक्ता लोकसेवक म्हणून कर्तव्य पार पाडणार असल्याने चारित्र्य पडताळणी आवश्यक राहील.

६. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक ही तात्पुरता स्वरुपाची असून कोणतीही पूर्वसुंचना न देता केव्हाही संपुष्टात आणण्यात येईल.

७.विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या नेमणूका फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५(३) मधील तरतुदी नुसार विशिष्ट फौजदारी प्रकरणासाठी असली तरी त्यास नेमून दिलेल्या न्यायालयातील बोर्डावरील दैनंदिन फौजदारी प्रकरणे हाताळणे आवश्यक राहिल.

८. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता काम असमाधानकारक असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा त्याचेविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यास त्यांना कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांची तात्पुरता स्वरुपातील नियुक्ती रद्द करण्यात येईल.

९. तात्पुरता स्वरुपातील पॅनलवर निवड झालेल्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्तयाची जिल्हयातील कोणत्याही न्यायालयात काम करण्याची तयारी असावी त्यांना अन्य कोणत्याही प्रकरणात खाजगी व्यक्तीतर्फे खटल्यात काम करता येणार नाही.

१०.विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ताने चालवलेंल्या फौजदारी प्रकरणांच्या कामाबाबतचा मासिक अहवाल सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता,बृंहन्मुंबई यांचेकडे सादर करावा.

११.सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, बृंहन्मुंबई हे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ताचे पर्यवेक्षी व नियंत्रण अधिकारी असतील व त्यांचे सूचनांचे व आदेशांचे पालन करणे हे निवड झालेल्या तात्पुरत्या स्वरुपातील पॅन्लवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्तांना बंधनकारक असेल.

Rojgarmarathi.com

१२.विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून शासनाचा पूर्णवेळ सेवक म्हणून नियुक्ती नसल्याने तात्पुरत्या स्वरुपाचे पॅनलवर कितीही वर्षे काम पाहिले तरी त्यांना नियमित विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदावर हक्क सांगता येणार नाही. तसेच या कालावधीचा फायदा अन्य कोणत्याही शासकीय पदाचे नियुक्तीकामी वयोमर्यादेतील सुट म्हणून घेता येणार नाही.

१३.विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्तयांना शासकीय पदाचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.

१४.मुंबई उपनगर जिल्हयातील सध्या कार्यरत असलेल्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी या पॅनलसाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

१५.सदर परिणामकारक सुनावणीसाठी व प्रतिदिनीची कमाल मर्यादा:-

| | |
|---|---|
| अ) प्रतिदिनी परिणामकारक सुनावणीसाठी व प्रतिदिनी कमाल मर्यादा- | रु.६००/- |
| ब) एका जामीन अर्जाच्या विरोधाकरीता- | रु.४००/- |
| क) प्रतिदिनाची कमाल मर्यादा - | रु.१०००/- |

टिप- एका पेक्षा जास्त सुनावणी किंवा जामीन अर्जांचे विरोधाचे काम चालवले तरी मानधनाची प्रतिदिनी कमाल मर्यादा रु.१००० राहील. प्रस्तावीत तात्पुरत्या स्वरुपातील पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्तास कोणत्याही परीस्थितीत प्रतिदिन एकूण १००० पेक्षा अधिक मानधन अनुज्ञेय असणार नाही.

१६.तात्पुरत्या स्वरुपात तयार करण्यात येणा-या पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदासाठी विहीत नमून्यातील अर्ज, स्वत:चा अचुक पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व वैयक्तीक शैक्षणिक व अनुभवाच्या तपशिलासह दस्ताऐवजांचे छायांकीत प्रतीसह दिनांक ०२/०३/२०२२ ते १६/०३/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत,वांद्रे (पूर्व), मुंबई ५१ या कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. तसेच http://mumbaisuburban.gov.in या वेबसाईटवर जाहीर/प्रसिध्दी पत्रक व अर्जांचा नमुना उपलब्ध आहे. तसेच कार्यालयात कार्यालयीन वेळेतही उपलब्ध आहे. तरी मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

(स्वाक्षरीत)
(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर**

Rojgarmarathi.com

**अर्जाचा नमुना**

फोटोवर स्वताची स्वाक्षरी करावी.

प्रति,
मा.जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,१० वा मजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१

महोदय,

**मी -----------------------------------------------------पदासाठी अर्ज करीत असुन माझा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

१. संपूर्ण नांव :- ---------------------------------------------------------
(आडनांव प्रथम लिहावे)

२.पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- --------------------------------------------------------
(पिन कोड सहित) --------------------------------------------------------
---------------------------------------------------------

३.भ्रमणध्वनी क्रमांक :- :- ---------------------------------------------------------

४.अर्जदाराची जन्मतारीख :- :---------------------------तारीख ----------महिना------------वर्षे

५. जाहिरात प्रसिध्द दिनांक ०२/०३/२०२२रोजीचे वय :- ------------- वर्षे--------------महिने----------दिवस

६. विवाहीत/अविवाहीत :- ----------------------------

७. अधिवास दाखला क्रमाक व दिनांक :- ---------------------------------

८. लिंग (स्त्री/पुरुष) :- -------------------------------

**९.अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :-**

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्षे | एकुण मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

**१०.वकिलीच्या सनदेचा तपशिल:**

सनद मिळाल्याचे वर्षे :- ------------------------
नोंदणी क्रमांक :- ------------------------

**११. ५ वर्षापेक्षा जास्त वकिलीच्या अनुभवाचा तपशिल :-**

| अ.क्र. | कालावधी | | एकूण वर्षे | वकिलीचा कामकाजाचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**१२.अर्जदारांनी उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने,:-**

१.शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म दाखला
२.शैक्षणिक पदवी / पदवीका प्रमाणपत्र
३.वकिलीची सनद
४.अधिवास प्रमाणपत्र
५.अर्जदाराचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त असल्यास जातीचे प्रमाणपत्र. (मागासवर्गीय अर्जदारांसाठी)
६.वकिलीच्या अनुभवाची प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र इ.बाबींच्या साक्षांकीत प्रती पुरावा म्हणून अर्जासोबत सादर करावे.

**घोषणापत्र**

१.अर्जदाराकडे वकिलीची सनद आहे काय? होय / नाही

२.अर्जदाराकडे वकिलीचा ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे काय? होय / नाही

३.अर्जदारास मराठी, हिंदी,इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान आहे काय? होय / नाही

४.अर्जदारास फौजदारी विषयक व इतर कायदयाचे ज्ञान आहे काय? होय / नाही

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व बरोबर आहे. वर दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास मी अपात्र राहीन व भारतीय दंड संहितेअंतर्गत कारवाईस पात्र राहीन याची मला जाणिव आहे.

**ठिकाण:**

**दिनांक: / /२०२२** **अर्जदाराची स्वाक्षरी/-**

**(फक्त विवाहित उमेदवारांसाठी)**
**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ प्रमाणे**

## प्रतिज्ञापत्र
## नमुना — अ (नियम ४ पहा)

मी.श्री.श्रीमती/------------------------------------------------------------------------------- श्री.-----------------------------------------------यांचा/यांची मुलगा/ मुलगी/ पत्नी वय-----------वर्षे रा.--------------------------------------------------------------यादवारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की, १) मी------------------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे. २) आज रोजी मला--------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------------इतकी आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा) ३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह (अपात्र) ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :**
**दिनांक :** / /२०२२ **अर्जदारांची स्वाक्षरी/-**